# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** अमरावती शहर **P.S.(ठाणे):** फ्रेजरपूरा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0487 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**04/07/2023 21:15

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
   **Time Period (कालावधी):** पहर 4
   **Date From (दिनांक पासून):** 04/07/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 04/07/2023
   **Time From (वेळेपासून):** 11:59 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 12:20 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 04/07/2023 **Time (वेळ):** 21:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 046

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 04/07/2023 21:15 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कार्यालय प्रादेशिक उपसंचालक इत,मागास बहुजन कल्याण विभाग समाज, कल्याणविभाग कार्यालय अमरावती

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** जगदीश निळकंठराव राहाटे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1965

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | महालक्ष्मी अपार्टमेंट,अनंत ,विहार कॉलनी,ईच्छामनी,हनुमान मंदिराजवळ अमरावती,गाडगे नगर,अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | महालक्ष्मी अपार्टमेंट,अनंत ,विहार कॉलनी,ईच्छामनी,हनुमान मंदिराजवळ अमरावती,गाडगे नगर,अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9890103132

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सत्यवान रामचंद्र बांबोर्डे | | | 1. कॅम्प कर्नर चपराशीपुरा , अमरावती,फ्रेजरपूरा,अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., If any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

अप नं - 487/2023 कलम7 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनीयम 1988
फिर्यादी - श्री जगदीश निळकंठराव राहाटे वय 58 वर्षे (खाजगी नोकरी) रा.महालक्ष्मी अपार्टमेंट,अनंत विहार कॉलनी,ईच्छामनी हनुमान मंदिराजवळ अमरावती, मो.9890103132,963723739
आरोपी - सत्यवान रामचंद्र बांबोर्डे वय 53 वर्ष, धंदा नौकरी रा. महालक्ष्मी नगर महालक्ष्मी बगीच्या जवळ नेर जि. यवतमाळ ह.मु. कॅम्प कॉर्नर चपराशीपुरा अमरावती
घ ता वेळ – दि 04/07//2023 चे 11.59वा. 12.20 वा. दरम्याण
दा ता वेळ- दि 04.07.2023चे 21.15 वा
घटनास्थळ- कार्यालय प्रादेशिक उपसंचालक इतर मागास बहुजन कल्याण विभाग समजा कल्याण विभाग कार्यालय अमरावती

नक्कल जबानी रिपोर्ट- जगदिश निळकंठराव राहाटे वय 58 वर्षे (खाजगी नोकरी) रा.महालक्ष्मी अपार्टमेंट,अनंत विहार कॉलनी,ईच्छामनी हनुमान मंदिराजवळ अमरावती, मो.9890103132,963723739 मी वरील प्रमाणे असुन वर नमुद पत्यावर मी माझ्या कुटुंबासोबत राहतो आहे व मी दि.03/07/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती येथे येवून माझी तक्रार दिली की, वरिल नमुद पत्यावर माझी पत्नी सौ मिना जगदिश रहाटे व दोन मुलांसह वास्तव्यास आहे. माझी पत्नी ही समाजकल्याण विभागाअंर्तगत चालविण्यात येणा-या श्री.गोविंद गुरूकुल आश्रम शाळा रिध्दपुर ता.मोर्शी जि.अमरावती या शाळेमधुन 31 जुलै 2022 रोजी अधिक्षक या पदावरून सेवानिवृत्त झालेली आहे. माझी पत्नी सेवानिवृत्त झाल्यानंतर मिळणारे लाभ जसे जि.पी.एफ. रू.16,49,532/- व पदोन्नती बिल रू.4,33,500/- अंदाजे असे बिल मिळण्यासाठी 20/10/2022 रोजी अर्ज सुध्दा केलेला होता. मा.सहायक आयुक्त समाजकल्याण विभाग यांचे नावे माझे पत्नीने अर्जसुध्दा केलेला आहे. तरी अदयापपर्यंत बिल मंजुर झालेले नसल्याने वर नमुद बिलाचा पाठपुरावा करण्यासाठी मी स्वतः 7 ते 8 वेळा कार्यालयात गेलेलो होतो. तरी मागील आठवडयात बिल मंजुर झाले किंवा नाही विचारण्यास गेलो असता समाजकल्याण कार्यालयातील बाबु श्री.सत्यवान बांबोर्डे यांना विचारणा केली असता बाबु श्री.सत्यवान बांबोर्डे यांनी माझ्या पत्नीचे नावे असलेलें रू. 16,49,532/- रकमेचे जि.पी.एफ.मंजुर करण्यासाठी एकुन रू 12,000/- (बारा हजार) ची मागणी केली तेव्हाच तुमचे बिल लवकर मंजुर होईल, त्यावेळी त्यांना नाईलाजास्तव हो म्हणुन निघुन आलो. परंतु मला बाबु श्री.सत्यवान बांबोर्डे यांना लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने आजरोजी मि लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अमरावती येथे श्री. सत्यवान बांबोर्डे यांच्याविरूध्द तक्रार देण्यासाठी आलो आहे.श्री.सत्यवान बांबोर्डे यांच्यासोबत माझे कोणतेही आर्थिक वादविवाद,भांडण तंटा किंवा पैशाचे व्यवहार नाही तरी बाबु श्री.सत्यवान बांबोर्डे यांचेवर अँन्टी करप्शनची कारवाई करण्यात यावी. माझी पत्नी ही उच्च रक्तदाब व शुगरमुळे खुप दिवसापासुन आजारी असल्यामुळे तक्रार देण्यास येऊ शकत नाही तिने मला तक्रार देण्याकरीता संमतीपत्र दिले आहे. तरी योग्य ती कठोरात कठोर कार्यवाही करण्यात यावी. अशा आशयाची लेखी तक्रार दिली.त्यानंतर पोनि मांजरे साहेब यांनी विभागीय कृषी सहसंचालक अमरावती विभाग अमरावती येथुन पंच श्री. प्रशांत बाबुजी सलामे, पद - कृषी पर्यवेक्षक व श्री.दिपक पुरूषोत्तम तायडे, पद - कनिष्ठ लिपीक असे दोन सरकारी पंच कारवाई करीता बोलविले. सदर दिलेल्या लेखी तक्रारीवर त्यावर पंच क्र.1 श्री.सलामे यांनी षेरा लिहुन दोन्ही पंचांनी तक्रारीवर सहया केल्या व समक्ष म्हणुन पोनि मांजरे साहेब यांनी सुध्दा सही केली आहे. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मांजरे साहेब यांनी सांगीतले की, मला आलोसे हे खरच लाच रक्कम मागणी करीत आहे किंवा नाही याबाबत पडताळणी कार्यवाही करण्याचे सांगीतले वरुन लागलीच माझेजवळ व्हाईस रेकॉर्डर चालू करुन पंच क्र.1 श्री.सलामेसह समाज कल्याण विभाग कार्यालय अमरावती येथे श्री. सत्यवान बांबोर्डे यांना भेटण्याकरीता रवाना केले. त्याठिकाणी पोहचल्यानंतर लोकसेवक श्री.बांबोर्डे हे बाथरूमकडे येताना दिसले म्हणुन आम्हीपण बाथरूममध्ये त्यांचे मागे गेलो असता, पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. सत्यवान बांबोर्डे यांनी मला माझे पत्नीचे जि.पी.एफ.बिल व इतर बिल लवकर मिळून देण्याकरीता 10,000/-रू व

बिल निघाल्यावर 2,000/- रुपये पंचासमक्ष लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम उदया दि.04/07/2023 रोजी स्विकारण्याचे निश्पन्न झाल्याने लोकसेवक श्री.बांबोर्डे यांचे विरुध्द दि.04/07/2023 रोजी सापळा कार्यवाही आयोजित करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. झालेल्या कारवाईचा मांजरे साहेब यांनी सविस्तर पंचनामा केला. दिनांक 04/07/2023 रोजी सकाळी 10.30 वा.च्या सुमारास दोन्ही पंच आम्ही सगळे कार्यालयात हजर आलो. त्यानंतर मांजरे साहेबांनी लाचेची रक्कम हजर करण्यास सांगितले असता मी 10,000/- रुपये ज्यामध्ये 500 रुपये दराच्या 20 नोटा हजर केल्या. त्या नोटांचे क्रमांक पो.नि.मांजरे यांनी पंच क्र.1 श्री.सलामे यांना वाचण्यास सांगुन पंच क्र.2 श्री.तायडे यांना को-या कागदावर लिहिण्यास लावले व त्यावर पंचांनी व मांजरे साहेब यांनी सहया केल्या. त्यानंतर मांजरे साहेब यांच्या सुचनेवरून स्टाफ राहुल वंजारी यांनी मी हजर केलेल्या नोटांला अँन्थ्रासीन पावडर लावुन प्रात्यक्षिक करून तसेच मला व पंचाना अल्ट्राव्हायलेट लॅम्प बाबत माहीती दिली. त्यानंतर हजर केलेल्या लाच रक्कमेला अँथ्रासिन पावडर लावुन लाच रक्कम माझे षर्टच्या डाव्या बाजुच्या खिषामध्ये ठेवुन दिली. व स्टाफ युवराज राठोड यांनी व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवून मला व पंच क्र.1 श्री.सलामे असे आलोसे श्री. सत्यवान बांबोर्डे यांची भेट घेण्याकरीता समाज कल्याण विभाग कार्यालय अमरावती येथे रवाना केले, त्यानंतर आमच्या पाठोपाठ आपण सापळा पथकातील इतर कर्मचारी व अधिकारी हे खाजगी वाहनाने समाज कल्याण विभाग अमरावती कार्यालय येथे येवुन कार्यालयाच्या आजुबाजुला आडोसा घेवुन थांबले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 श्री. सलामे असे कार्यालयात गेलो असता, लोकसेवक कनिश्ठ लिपीक श्री.सत्यवान बांबोर्डे, यांनी माझे पत्नीचे जि.पी.एफ.चे बिल लवकरात लवकर मंजुर करुन काढून देण्याकरीता तडजोडीअंती सापळा कारवाई दरम्यान 10,000 रूपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली त्यानंतर मी लागलीच लाच रक्कम स्विकारण्याचा नियोजित इषारा केला. त्यावेळी तात्काळ माझे जवळ मांजरे साहेब, पंच क्र.2 श्री.तायडे तसेच सापळा पथकातील सर्व स्टाफ त्याठिकाणी आले व त्यांनी श्री.बांबोर्डे यांना ताब्यात घेतले. तेव्हा राठोड यांनी माझ्या जवळील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केले. मांजरे साहेब यांनी श्री.सत्यवान बांबोर्डे यांना त्यांचे नाव, पद, व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री. सत्यवान रामचंद्र बांबोर्डे, वय 53 वर्श पद- कनिश्ठ लिपीक, मुळ नेमणुक - हौसाबाई आठवले, माध्यमिक आश्रम षाळा, चि[illegible]ली डोमगाव ता.नेर जि.यवतमाळ. सध्या प्रतिनियुक्ती - कार्यालय, प्रादेषीक उपसंचालक्र,इतर मागास बहुजन कल्याण वि[illegible]माज कल्याण अमरावती. रा. महालक्ष्मी नगर, महालक्ष्मी गार्डन जवळ नेर ता.नेर जि. यवतमाळ. व[illegible]3 असे सांगितले. त्यावेळी श्री.बांबोर्डे यांनी माझ्या कडुन स्विकारलेली लाच रक्कम जी त्यांचे पॅन्टच्या खिष्यात ठेवलेलेली लाच रक्कम मांजरे साहेब यांनी श्री.बांबोर्डे यांचेकडुन पंचासमक्ष जप्त केली. व पुढील कार्यवाही करीता लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय अमरावती येथे आलो. केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा केला. तरी मला माझे पत्नीचे जि.पी.एफ.बिल मंजुर करुन लवकरात लवकर मिळून देण्याकरीता प्रादेषिक उपसंचालक, इतर मागस, बहुजन कल्याण, समाज कल्याण विभाग अमरावती येथील कनिश्ठ लिपीक श्री.सत्यवान बांबोर्डे, यांनी दिनांक 03/07/2023 रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान तडजोडीअंती 12,000/-रू लाचेची मागणी करून सदर लाच रक्कमेपैकी आज दिनांक 04/07/2023 रोजी पहिला टप्पा 10,000/- लाच रक्कम पंचासमक्षक स्विकारल्याने त्यांचे विरूध्द माझी कायदेषीर फिर्याद आहे.माझी वरिल प्रमाणे फिर्याद लॅपटॉपवर टाईप केली असुन त्याची प्रिंट काढूण ती मला वाचायला दिली, माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी टाईप केली आहे. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Gorakhnath Ramnath Jadhav(I (Inspector)) / 14801000362GRIM7401S **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Gorakhnath Ramnat
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** 14801000362GRJM740: